# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.07.2025** **वारःशुक्रवार**

---

- भारत आणि ब्रिटन दरम्यान ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी
- केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ जाहीर
- दिल्लीतल्या जेएनयूमध्ये छत्रपती शिवाजी महाराज संरक्षण आणि सामरिक अध्यासन केंद्र आणि कुसुमाग्रज मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती अध्यासन केंद्राचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
- २००६च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी 12 आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती
- सहा फुटापेक्षा मोठ्या गणेशमूर्ती समुद्रात विसर्जन करण्यास मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी
- आणि
- राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाचा अंदाज; कोकणात मुसळधार पावसाचा इशारा

**पंतप्रधान ब्रिटन करार**

**इंट्रो ----**

भारत आणि ब्रिटननं काल ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यात लंडनमध्ये झालेल्या बैठकीनंतर या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. दोन्ही देशांसाठी हा ऐतिहासिक दिवस असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी यावेळी सांगितलं. हा करार भारतातले शेतकरी, मासेमार, सुक्ष्म लघू आणि मध्यम उद्योजक तसंच तरुणांसाठी विशेष लाभदायक ठरेल, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला. ते म्हणाले –

**बाईट पंतप्रधान -**

ब्रिटनचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान मोदी आज मालदीव्जला रवाना होणार आहेत, त्यांच्या स्वागतासाठी मालदीव्जची राजधानी माले सज्ज झाली आहे. या भेटीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मालदीव्जचे राष्ट्रपती डॉ. मोहम्मद मुइज्जु यांच्यात बैठक होणार आहे; दोन्ही देशांमध्ये काही द्विपक्षीय करार देखील होण्याची शक्यता आहे.

**<u>शाह राष्ट्रीय सहकार धोरण</u>**

**<u>इंट्रो -----</u>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत काल दिल्लीत राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ जाहीर करण्यात आलं. सहकारी संस्थांना समावेशी बनवणं, व्यावसायिकदृष्ट्या त्यांचं व्यवस्थापन करणं, आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्यासाठी त्यांना सक्षम बनवणं, हे या धोरणाचं उद्दिष्ट्य आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताचं ध्येय गाठण्यामध्ये या धोरणाची मोठी भूमिका असेल, असं शहा यांनी व्यक्त सांगितलं. ते म्हणाले –

**<u>बाईट - अमित शहा-</u>**

**<u>संसद</u>**

विविध मुद्द्यांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज कालही दिवसभरासाठी तहकूब झालं. राज्यसभेत काल उपाध्यक्ष हरिवंश यांनी नवनियुक्त सदस्य उज्ज्वल निकम यांना शपथ दिली. कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या सहा निवृत्त सदस्यांना काल सभागृहात निरोप देण्यात आला.

**<u>फडणवीस जेएनयु</u>**

**<u>इंट्रो</u>**

भाषा हे संवादाचं प्रभावी साधन आहे; प्रत्येकाने आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगताना इतर भारतीय भाषांचाही सन्मान ठेवला पाहिजे असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात श्री छत्रपती शिवाजी महाराज सामरिक आणि सरंक्षण विशेष अध्यासन केंद्र आणि कुसुमाग्रज मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती अध्यासन केंद्राचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल झालं; त्यावेळी ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रत्येक लढाई हे सामरिक शक्तीचं उदाहरणं आहे; महाराजांनी मराठी माणसामध्ये विजिगीषूवृत्ती रुजवली असं मुख्यमंत्री म्हणाले....

**मुख्यमंत्री**

जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कुलगुरू शांतिश्री पंडित, राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत, छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज बाबाजीराजे भोसले आदी मान्यवर या समारंभाला उपस्थित होते.

**साखळी बॉम्ब स्फोट पूल माधुरी**

२००६मध्ये मुंबई उपनगरी रेल्वेत झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातल्या सर्व 12 आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या, मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे. राज्य सरकारनं, मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, त्यावर काल न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन.के. सिंह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

उच्च न्यायालयाच्या निकालातल्या काही निरीक्षणांमुळे मकोका अंतर्गत प्रलंबित असलेल्या इतर खटल्यांवर परिणाम होऊ शकतो, म्हणून या निर्णयाला स्थगिती द्यावी अशी विनंती राज्य सरकारच्या वतीनं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केली. मात्र उच्च न्यायालयाच्या निकालानंतर तुरुंगातून सुटलेल्या आरोपींनी पुन्हा आत्मसमर्पण करावं अशी कोणतीही मागणी नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयानं मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती दिली. तसंच, या सर्व आरोपींना पुन्हा तुरुंगात ठेवण्याची आवश्यकता नाही असं स्पष्ट केलं.

**गणेश विसर्जन भावसार**

यंदाच्या गणेशोत्सवात सहा फुटांपेक्षा अधिक उंचीच्या गणेशमूर्तींचं विसर्जन समुद्रात आणि नैसर्गिक जलप्रवाहांत करायला मुंबई उच्च न्यायालयानं परवानगी दिली आहे. प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मूर्तींसाठी ही परवानगी केवळ या वर्षापुरती असल्याचं, मुख्य न्यायमूर्ती आलोक आराध्ये आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठानं आदेशात स्पष्ट केलं आहे. सहा फूट उंचीपर्यंतच्या सर्व पीओपी मूर्तींचं विसर्जन कृत्रिम तलावांमध्येच करण्यासाठी आवश्यक प्रमाणात कृत्रिम तलावांची व्यवस्था करावी, असाही आदेश न्यायालयानं दिला आहे.

**एसटी भावसार**

गौरी गणपती सणासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या एकेरी गट आरक्षणावरील ३० टक्के भाडेवाढ यंदासाठी रद्द केल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल केली. गणपती उत्सव, दिवाळी, होळी या उत्सव काळात

एसटी महामंडळ प्रवाशांना सेवा देत आली आहे, त्यामुळे प्रवाशांनीही एसटीच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करावा, भविष्यात तिकीट दरवाढ केली तर सहकार्य करावं असं आवाहन सरनाईक यांनी केलं.

**उपमुख्यमंत्री पांढरे**

संत नामदेव महाराज परिवार आणि संत जनाबाई यांच्या 675व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त भक्त शिरोमणी संत श्री नामदेव महाराज पुरस्कार काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पंढरपूर इथं प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ म्हणून स्विकारल्याची भावना शिंदे यांनी व्यक्त केली.

**खड्डे उपाय**

**इंट्रो ---**

पावसाळ्यात रस्त्यावर पडणाऱ्या खड्ड्यांची तक्रार नेमकी कुठे आणि कशी करायची असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडतो. या प्रश्नावर पुणे महापालिकेने एक नामी उपाय शोधून काढला आहे. महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी याबाबत आकाशवाणीला माहिती दिली.

**बाईट पावसकर ---**

**क्रिकेट**

इंग्लंड विरुद्धच्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेत मँचेस्टर इथं सुरू असलेल्या चौथ्या सामन्यात भारताचा पहिला डाव काल दुसऱ्या दिवशी 358 धावांवर आटोपला. जखमी अवस्थेत खेळताना ऋषभ पंतने 54 धावा केल्या. इंग्लंडने देखील जोरदार प्रत्युत्तर दिले असून काल दिवसअखेर त्यांच्या 2 बाद 225 धावा झाल्या होत्या. इंग्लंड या मालिकेत 2-1 ने आघाडीवर आहे.

**फिडेमहिला**

बटूमी इथं सुरू असलेल्या फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख या दोन भारतीय महिलांमध्ये लढत होणार आहे. काल झालेल्या उपान्त्य फेरीत दिव्या देशमुख हिनं चीनची ग्रँडमास्टर तान छोंग्यी हिला मात दिली, तर कोनेरु हंपीनं चीनच्याच लेईतिंगजेइ हिला पराभूत केलं.

**हवामान**

येत्या २४ तासात मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे; रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह पुणे, सातारा आणि कोल्हापूर घाट परिसरात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# याबरोबरच हे प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार ..